# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर-४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दूरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००

संकेतस्थळ: http:sus.ac.in ई-मेल : registrar@sus.ac.in

bos@sus.ac.in


NAAC Accredited-2022 'B++' Grade (CGPA-2.96)

## अभ्यासमंडळे विभाग

**जा.क्र. पुअहोसोविसो/अमंवि/२०२३/** 8113 **दिनांक:** 24 NOV 2023

## अत्यंत महत्वाचे

प्रति,

१) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये

२) मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुरु झालेला **B.A. / B.Com. Part-II Compulsory English** पेपर सुधारित करण्यात आलेबाबत.

संदर्भ : १) दिनांक २७/१०/२०२३ रोजीच्या मा. विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १.
२) अभ्यासमंडळे विभागाची दिनांक २०/११/२०२३ रोजीची मान्य टिपणी.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुरु झालेल्या B.A./B.Com. Part-II English या अभ्यासक्रमाकरिता संदर्भ क्र.१ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने B.A./B.Com. Part-II English अभ्यासक्रमाचा सर्वकषं अभ्यास करुन B.A./B.Com. Part-II Compulsory English या पेपर मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा सुचविली आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र. १ | विद्यापरिषदेच्या ६० व्या बैठकीमध्ये मागील सभेच्या इतिवृत्ताची नोंद घेत असताना बी. ए. भाग-दोन इंग्रजी आवश्यक विषयाचे क्रमीक पुस्तक दहा दिवसात तयार करण्याचे ठरले. त्या अनुषंगाने इंग्रजी अभ्यासमंडळाने तयार केलेल्या पाठ्यक्रमातील काही घटकांना "स्वामीत्व कायद्या" **(Copy Right)** ची अडचण येत असल्यामुळे **Sem-III** साठी **"The Great Derangament-Amitav Ghosh"** ऐवजी **"Orpheus and Eurydice-by W. B. Forbush"** व कवितेमधील दुसरे (युनिट) घटक **"This is a Photograph of me -by Margaret Atwood"** ऐवजी **"Daffodils by William Wordsworth"** असा बदल करण्याचे ठरले. |
| ठराव क्र. २ | त्याचप्रमाणे इंग्रजी आवश्यक मधील **Sem-IV** घटक एक गदय क्र. एक - **"Karma by Khushwant Singh"** ऐवजी **"Values in Life by Rudyard Kipling"** व गद्य क्र. तीन **"A Tresure from Ramu by Sudha Murthy"** ऐवजी **"The Last Leaf by O' Henry"** तसेच घटक दोन मधील काव्य नं. एक **"Middle Age -by Kamla Das"** ऐवजी **"Ulysses -by A. L. Tennyson"** असा बदल करण्याचे सर्वानुमते ठरले. |

सदर सुधारणा करण्यास मा. कुलगुरु महोदयांनी संदर्भ क्र. ०२ च्या टिपणीवर तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. विद्यापरिषदेच्यावतीने मान्यता प्रदान केली आहे.

सदर सुधारित अभ्यासक्रम दिनांक २४/११/२०२३ रोजी विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. कृपया सदर बदलाची नोंद घेवून आपल्या अधिपत्याखालील सर्व संबंधितांना सदर बाब अवगत करुन देवून, या प्रमाणे पुढील कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. यु. व्ही. मेटकरी)
उपकुलसचिव

सोबत : सुधारित अभ्यासक्रमाची प्रत.